**छपाई बाबत दरपत्रके सादर करणे**

27 FEB 2018

क्रमांक- पोआअ/प्रबंधक शाखा/पो.भरती/फॉर्मछपाई -दरत्रके/ 2056 /२०१८ अमरावती शहर दिनांक

**विषय :-** पोलीस भरती-२०१८ चे फॉर्म छपाई करावयाचे असल्याने दरपत्रके सादर करणे बाबत.

---०००---

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, या कार्यालयाचे आस्थापनेवर सन २०१८ ची पोलीस भरती होणार असल्याने त्याकरीता खालील प्रमाणे फॉर्म छपाई करावयाचे आहेत. त्याकरीता ईच्छूक पुरवठादार/दुकानदार/प्रिंन्टींग मुद्रणालय यांनी खालील प्रमाणे फॉर्म छपाई बाबतचे दरपत्रक दोन लिफाफा पध्दतीने या कार्यालयास ०३ दिवसाचे आंत शासकीय सुटटी वगळून म्हणजेच दिनांक ०१/०३/२०१८ पर्यंत न चुकता सादर करावेत.

| अ.क्र. | फॉर्म चा नमुना | अंदाजे अपेक्षीत संख्या |
|---|---|---|
| १ | पुरूष उमेदवाराची उंची व छातीचा मोजमाप नमुना | ४००० प्रती |
| २ | महीला उमेदवारी उंची मोजमाप नमुना | १५०० प्रती |
| ३ | अपात्रतेचे पत्र नमुना ( पुस्तक बांधणी १०० पेजेस प्रमाणे) | २००० प्रती |
| ४ | पोलीस भरती प्रक्रीयेमध्ये कोणी नातेवाईक नसल्याचे घोषणाप्रमाणपत्र नमुना | ५०० प्रती |
| ५ | पुरूष उमेदवारांच्या शारीरीक चाचणीचे गुण नोंदविण्यासाठी नमुने (१६०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे, गोळा फेक, लांब उडी, १० पुल अप्स व सर्व चाचणीचे एकत्रित गुण नोंदविण्याचा तक्ता) | ३०० प्रती |
| ६ | महीला उमेदवारांच्या शारीरीक चाचणीचे गुण नोंदविण्यासाठी नमुने (८०० मीटर धावणे, १०० मीटर धावणे, गोळा फेक, लांब उडी, व सर्व चाचणीचे एकत्रित गुण नोंदविण्याचा तक्ता) | १०० प्रती |
| ७ | डिटेल वाटप नमुना | ३०० प्रती |

वर नमुद फॉर्मचा नमुना यासोबत जोडलेला आहे. तरी ईच्छूक पुरवठादार/वितरक/मुद्रणालय यांनी आपली दरपत्रके दोन लिफाफा पध्दतीनुसार या कार्यालयास ०१/०३/२०१८ पर्यंत न चुकता सादर करावीत. पहिला लिफाफा विवरणपत्र -१ हा तांत्रिक लिफाफा म्हणून तसेच दुसरा लिफाफा हा विवरणपत्र-२ असे दोन लिफाफा कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे. तांत्रिक लिफाफामध्ये खालील आवश्यक कागदपत्रे असणे आवश्यक आहेत.

१. शॉप ॲक्ट प्रमाणपत्राची छायांकीत प्रत (आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र)
२. GST प्रमाणपत्र
३. पॅन कार्डची छायांकीत प्रत

तांत्रिक लिफाफा (विवरणपत्र-१) मध्ये वर नमुद केलेले आवश्यक कागदपत्रे आढळून आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया संबधीतांनी नोंद घ्यावी. प्राप्त झालेली दरपत्रके उघडण्याबाबतचा दिनांक व वेळ संबधीतांना दुरध्वनीद्वारे/ई-मेलद्वारे सूचीत करण्यात येईल. तसेच विवरणपत्र-२ मध्ये ब्रॅन्डेड कंपनीचे वेबकॅम व प्रिन्टरचे दर असणे अनिवार्य आहे, सदरचे पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. तरी ईच्छूक निविदाधारकांनी दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके या कार्यालयास विहीत मुदतीत सादर करावीत हि विनंती.

(पोलीस आयुक्त, यांचे मान्यतेने)

( एम.एच. बैस )
कार्यालय अधिक्षक
पोलीस आयुक्त,अमरावती करीता.

**प्रति,**

१. ----------------------------------------------------
२. ----------------------------------------------------
३. ----------------------------------------------------

**प्रत,** पोउपनि, सायबर सेल,

२/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे www.amravaticitypolice.gov.in या संकेतस्थळावर अपलोड करून अपलोड केल्याबाबतची प्रत कृपया प्रबंधक शाखेत परत करावी.



Scanned by CamScanner